सायं.दैनिक

बीड

# प्रारंभ

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे

बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ थे ■ अंक ६३ बुधवार दि. २४ एप्रिल २०२४ RNI MAHMAR/2021/81481 ■ Email-prarambh2023@gmail.com पाने-४ किंमत ३ रुपये


## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : बीड लोकसभेसाठी वंचित बहुजन आघाडीकडून अशोक हिंगे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आज अशोक हिंगे यांनी उमेदवारीअर्ज दाखल केला. उद्या बीड शहरातून रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसवा प्रकाश आंबेडकर यांच्यासह इतर नेत्यांची उपस्थिती असणार आहे. आज साध्या पद्धतीने अर्ज दाखल केला असला तरी उद्या मात्र मोठ्या रॅलीचे आयोजन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.




# पंकजा मुंडेंचा उमेदवारी अर्ज दाखल

## पंकजा मुंडेंचा अर्ज दाखल करण्यासाठी धनंजय मुंडे, प्रितम मुंडे, सुरेश धस, बाळासाहेब आजबे, नमिता मुंदडा, लक्ष्मण पवार यांच्यासह आदींची उपस्थिती



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : बीड लोकसभेसाठी भाजपच्या अधिकृत उमेदवार पंकजा मुंडे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी पंकजा मुंडे यांच्यासोबत त्यांचा परिवारही पहायला मिळाला. यासह पालकमंत्री धनंजय मुंडे, खा.प्रितम मुंडे, आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे, आ.लक्ष्मण पवार, आ.नमिता मुंदडा, माजी आ.अमरसिंह पंडित यांच्यासह इतर प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. दुपारनंतर त्या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून रॅलीस सुरुवात करणार आहेत. ही रॅली सुभाष रोड मार्गे, अण्णाभाऊ साठे चौक, बसस्थानक, शिवाजी महाराज चौक, माने कॉम्प्लेक्स परिसरात याचे जाहीर सभेत रूपांतर होईल. या सभेमध्ये पंकजा मुंडे व धनंजय मुंडे काय बोलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



बीड लोकसभेसाठी भाजप यावेळेस प्रितम मुंडे यांना उमेदवारी न देता प्रितम मुंडे यांच्या बहीण पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर केली. यानंतर आज मोठे शक्तीप्रदर्शन करत पंकजा मुंडे बीडमध्ये दाखल झाल्या. दुपारी त्यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत दिग्गज नेत्यांचा फौजफाटा पहायला मिळाला. विशेष म्हणजे यावेळी परदेशात असलेला त्यांचा मुलगा अर्नवसुद्धा पंकजा मुंडे यांना सरप्राईज देत अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित होता. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पंकजा मुंडेंना गोपीनाथ मुंडे यांची आठवण आली, यावेळी त्या भाऊक झाल्या होत्या. मतदारांनी मला एकवेळेस संधी द्यावी त्या संधीचे सोने केल्याशिवाय मी राहणार नाही असं मत सुद्धा पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले. दुपारनंतर आयोजित करण्यात आलेल्या रॅलीला मोठ्या प्रमाणात जिल्ह्यातून मोठी गर्दी बीड शहरात दाखल झाली आहे. सभेमध्ये पंकजा मुंडे काय बोलतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



# आदर्श शिंदेंच्या भीमगीतांनी बीडकर मंत्रमुग्ध





## आ.संदीप क्षीरसागरांच्या भीमजयंतीसाठी स्टेडियम तुडुंब

बीड । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणेच यावर्षीही बीडची भीमजयंती आ. संदीप क्षीरसागर यांच्या नियोजनात सुपरहिट ठरली. आदर्श शिंदेंच्या भीमगीतांच्या कार्यक्रमाला शहरातील स्टेडियम अक्षरशः तुडुंब भरले होते. यावेळी बीड शहरासह तालुक्यातून तसेच जिल्ह्यातूनही या कार्यक्रमास लोक उपस्थित होते.

आदर्श शिंदेंच्या भीमगीतांनी बीडकरांना मंत्रमुग्ध केले.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मंगळवार (दि.२३) रोजी बीडमध्ये भारतरत्न डॉ.


### संविधान रक्षक संदिपभैय्या - आदर्श शिंदे

दरम्यान आदर्श शिंदे यांनी आ.संदीप क्षीरसागर यांचा उल्लेख संविधान रक्षक असा केला. तसेच आदर्श यांनी सध्यस्थितीवर नवीनच रचलेल्या ''गेला तर जाऊद्या आपला प्राण, पण वाचवा संविधान.'' हे गाण गायलं आणि हे सर्वात जास्त लक्षवेधी आणि कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. हे गाणे ऐनवेळी दिवसभरातच रचून सादर केल्याचे आदर्श शिंदे यांनी सांगितले.

### तुमच्यातलाच मी एक भीमसैनिक, संविधान वाचवण्यासाठी शेवटपर्यंत लढणार -आ.क्षीरसागर

छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले या तीन उद्धारकर्त्यांच्या जयंत्या आम्ही सण म्हणून साजऱ्या करतो. बाबासाहेबांच्या संविधानामुळे आणि मायबाप जनतेच्या आशीर्वादामुळे मी आमदार आहे. आज तुमच्यामुळे मी आमदार जरी असलो तरी तुमच्यातलाच मी एक भीमसैनिक आहे. सध्याच्या परिस्थितीत एका विशिष्ट शक्तीकडून संविधान बदलण्याची भाषा केली जात आहे. परंतु मी एक भीमसैनिक म्हणून संविधान वाचवण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहील.

## पेट्रोल-गॅस महागला, १०० पैकी ८७ जण बेरोजगार



## शरद पवारांनी मोदींच्या गॅरंटीचा हिशेब मांडला, ऑडिओ क्लिपही ऐकवली!

माढा । प्रतिनिधी

आज देशाचा कारभार पंतप्रधान मोदी यांच्या हातात आहे. सत्तेत येताना मोदींनी अनेक आश्वासनं दिलं होती. नरेंद्र मोदी २०१४ साली पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्या ५० दिवसांमध्ये महागाई कमी करु, असे आश्वासन दिले होते. मात्र, आजची परिस्थिती बघता मोदी साहेबांनी एकही शब्द पाळलेला दिसत नाही, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले. ते बुधवारी माढा लोकसभा मतदारसंघातील मोडनिंब येथील प्रचारसभेत बोलत होते.


यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांनी दिलेली किती आश्वासने प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत, याचा हिशेब मांडला. देशातील लोकांना महागाईच्या संकटातून मुक्त करणार, हे मोदींचं पहिलं आश्वासन होतं. आपण शेती करणारे लोक आहोत. एकेकाळी वाहनं कमी होती. पण आता वाहनांची संख्या वाढली आहे. मोटारसायकल असो किंवा चारचाकी असो त्यासाठी पेट्रोलची गरज लागते. २०१४ ला मोदी पंतप्रधान झाले तेव्हा ते म्हणाले होते की, पेट्रोलचा दर ५० टक्क्यांनी खाली आणणार. २०१४ मध्ये पेट्रोलचा प्रतिलीटर दर ७१ रुपये इतका होता. त्यामुळे हा दर ५० रुपयांपर्यंत खाली येईल, असे सामान्य जनतेला वाटले होते. पण आज त्यांची सत्ता येऊन ३६५० दिवस झालेत आणि पेट्रोलची प्रतिलीटर किंमत १०६ रुपये इतकी आहे. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था संकटात गेली, असे शरद पवार यांनी म्हटले.

घरामध्ये स्वयंपाकासाठी गॅस सिलेंडर लागतो. २०१४ मध्ये गॅस सिलिंडरची किंमत ४१० रुपये इतकी होती. आज हीच किंमत ११६० रुपयांवर पोहोचली

## सहाय्यक आयुक्त यांची विविध निवडणुक कक्षांना भेट

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्तच्यांवतीने सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन) डॉ. सीमा जगताप यांनी बीड जिल्ह्याच्या निवडणुकीविषयी विविध कक्षांना मंगळवारी सायंकाळी भेटी दिल्या.



छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त यांच्या प्रतिनिधी म्हणून डॉक्टर सीमा जगताप यांचा बीड जिल्ह्यात दौरा होता. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीविषयी कामकाज करणाऱ्या विविध कक्षांना भेटी दिल्या.

अपर जिल्हाधिकारी श्री कुलकर्णी यांची भेट घेतली

डॉ. जगताप यांनी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी त्यांच्या कक्षात भेट घेतली. यावेळी त्यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत ३९ बीड लोकसभा मतदार संघातील ईव्हीएम-व्हीव्हीपॅट कक्ष जो अपर जिल्हाधिकारी नियंत्रित करीत आहेत त्याची माहिती जाणून घेतली. बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅटची सरमिसळ झालेली असुन सहा विधानसभा मतदार संघाच्या स्ट्राँग रुम मध्ये पोहचविण्यात आले असल्याची माहिती श्री कुलकर्णी यांनी यावेळी दिली.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कक्षाला भेट

उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांच्या कक्षाला डॉ. जगताप यांनी भेट देऊन निवडणुकी विषयक आतापर्यंत झालेल्या कामकाजाची



महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या रुपाने राज्याला सामान्य माणसांची काळजी घेणारे असामान्य मुख्यमंत्री लाभले आहेत. त्यांच्या कर्तृत्वाची चुणूक वेळोवेळी येते. २४ एप्रिल रोजी विदर्भातील दिवसभराच्या व्यस्त दौऱ्यानंतरही अकोला येथे मध्यरात्री तब्बल २ वाजता साहेबांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी तोच जोश आणि चेहऱ्यावर तेच तेज दिसून आले. यावेळी धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा आरोग्यदूत बाजीरावजी चव्हाण यांचा त्यांच्या सहकाऱ्याने कॅमेऱ्यात टिपलेला एक क्षण.

## महामार्गावर चारचाकी वाहनांच्या धडकेत गंभीर जखमी काळवीटाचे ग्रामस्थांनी वाचवले प्राण

लिंबागणेश । प्रतिनिधी

काल दि.२३ एप्रिल मंगळवार रोजी सायंकाळी साडे ५ वाजता मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावर लिंबागणेश परीसरातील संगीत शाळेजवळ संगीत शाळेचे संचालक महादेव जगदाळे यांना चारचाकी वाहनाच्या धडकेत एक शिंग तुटलेले व एक पाय मोडलेल्या गंभीर जखमी अवस्थेत काळवीट दिसून आले. जगदाळे यांनी लिंबागणेश येथील विक्रांत वाणी यांना फोनवरून याची कल्पना दिली.विक्रांत वाणी यांनी लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे. संतोष राऊत व बाबासाहेब डोंगरे यांच्या सोबत घटनास्थळी भेट दिली.जखमी काळवीटला स्कार्पिओ गाडीत टाकून लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयासमोर आणण्यात आले.



डॉ.गणेश ढवळे यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी बीड अशोक काकडे, वनरक्षक डोळस .वनपाल बहिरवाळ यांच्याशी फोनवरून संपर्क करून जखमी काळवीटाची माहिती दिली. वनरक्षक डोळस यांनी वनविभागाची गाडी गेवराई येथे गेल्याने पोहचु शकत नसल्याचे सांगितले.विक्रांत वाणी यांनी स्वतःच्या स्कॉर्पिओ गाडीतुन काळवीटाला औषधोपचारासाठी बीडला सरकारी दवाखान्यात घेऊन गेले त्यांच्या समवेत संतोष वाणी आणि वनकर्मचारी आनिल शेळके हजर होते. सरकारी दवाखान्यात डॉ.चौरे यांनी जखमी काळवीटावर उपचार केल्यानंतर जखमी काळवीटास शिरूर कासार येथील वन्यप्रेमी सिद्धार्थ सोनावणे यांच्या सर्पराज्ञी प्रकल्पात नेऊन सोडले.

## एमपीडीए अंतर्गत पप्पू शिंदेंची हर्सूलच्या कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांचा मेहुणा असलेल्या पप्पू शिंदेवर अखेर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पहाटेच्या सुमारास पप्पूला हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली.पप्पू शिंदेंवर बीडमध्ये विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होते.जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांचा मेहुणा असल्याने त्याला पोलिसांकडून संरक्षण मिळत असल्याचा आरोप करण्यात येत होता.

बीड शहर आणि ग्रामीण पोलीस ठाण्यात ३०७ कलमाखाली पप्पू शिंदेंवर यापूर्वी दोन ते तीन गुन्हे दाखल



### बीड पोलिसांची मोठी कारवाई

करण्यात आलेले आहेत.बीडच्या जाळपोळ प्रकरणात ही मुख्य आरोपी म्हणून पप्पूचा समावेश होता.काही दिवसापूर्वी कुंडलिक खांडेचे राजकीय विरोधक असलेल्या उपजिल्हप्रमुख ज्ञानेश्वर खांडेवर जीवघेणा हल्ला ही पप्पूने केला होता.याप्रकरणात त्याच्यावर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.अखेर काल रात्री १०.३० ते ११ च्या सुमारास स्वामी समर्थ मंदिराशेजारी बीड शहर पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली आहे.त्याच्यावर एमपीडीअंतर्गत कारवाई करण्यात आली असून पहाटे त्याची हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली.ही कारवाई पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, मनोज परजने,अशपाक सय्यद, श्री.सिरसाट,सुशांत पवार, श्री.राठोड यांच्या वतीने करण्यात आली.


# इतिहास गाजवलेल्या मराठी स्त्रिया

शिवकाळ, पेशवेकाळ आणि सुरुवातीच्या ब्रिटिश कालखंडात महाराष्ट्राच्या भूमीवर अनेक राज्यकर्ते आणि त्यांच्या शिलेदारांनी इतिहास घडवला. या काळातील पुरुषांच्या कामगिरीच्या नोंदी करताना काही कर्तृत्ववान स्त्रियांची त्रोटक दखलही इतिहासाने घेतली आहे. या स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा संशोधनात्मक वेध म्हणजे 'वुमेन अँड पोलिटिकल पॉवर इन महाराष्ट्र अ ब्रीफ हिस्टरीकल रिव्ह्यू' हे पुस्तक. या स्त्रिया अर्थातच सत्ता, संपत्ती असलेल्या घराण्यांमधील आहेत. पहिल्या भागात सतराव्या शतकातील स्त्रियांबद्दल लिहिले आहे. निजामशाहीमधील बिबी अमिना यांनी अदिलशहा, कुतूबशहा आणि बरिदशहा यांना विजयनगरच्या फौजेला सामील होण्यापासून रोखले होते, चांदबिबी यांनी शस्त्रसज्ज होऊन अहमदनगर किल्ल्याच्या तटबंदीवर उभी राहून निजामशाही फौजांना मुघल फौजांशी सामना करण्यासाठी प्रोत्साहन दिले होते, तर अफजलखानाच्या स्वारीची महत्त्वाकांक्षी कल्पना अदिलशाहीतील बडी बिबी ऊर्फ बडी साहिबाची होती. भोसले घराण्यातील स्त्रियांमध्ये जिजाबाईचे व्यक्तिमत्व अनेक अंगांनी महत्त्वाचे ठरते. प्रशासनाबाबतचे निर्णय, वाद मिटवण्याचे कौशल्य, पदरी असलेल्या माणसांची मायेने घेतलेली काळजी या गुणांमुळे त्या सर्वांच्या आदरालाही पात्र ठरल्या होत्या. थोरल्या महाराणी सईबाईचा सल्ला शिवाजी महाराज राज्यकारभारात घेत असत, तर दुसऱ्या महाराणी सोयराबाईच्या राजकारणामुळे मराठा इतिहासाला वेगळे वळण लागल्याची नोंद पुस्तकात आहे. जिंजीच्या एकोजी महाराजांची पत्नी दीपाबाई यांनी दिलेल्या सल्ल्याचा शिवाजी महाराज आणि एकोजी महाराज यांच्या दिलजमाईत मोठा वाटा होता.

धामधुमीच्या काळात छत्रपती संभाजी महाराजांनी आपले शिक्के पत्नी येसूबाई यांच्याकडे सुरक्षित ठेवले होते, छत्रपती राजाराम महाराजांच्या पत्नी ताराबाई अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि आक्रमक होत्या. शस्त्रपारंगत ताराबाईनी गड अन् गड पिंजून काढला होता. राज्यकारभार आणि लढाया दोन्ही आघाड्यांवर त्यांनी खणखणीतपणे स्वत:ला सिद्ध केले. शाहू महाराजांच्या पत्नी विरुबाई यांचा पेशव्यांवरही वचक होता. ताराबाईचे पुत्र संभाजी महाराजांच्या पत्नी जिजाबाई यांनीही ताराबाईच्या पावलावर पाऊल टाकून कारभार केला. उमाबाई दाभाडे राजाराम महाराजांचे सरसेनापती तळेगावच्या खंडेराव दाभाडे यांच्या पत्नी. पंचहत्यारी उमाबाई हत्तीवर स्वार होऊन अहमदाबादची लढाई लढल्या होत्या. मराठा आरमाराला वेगळा आयाम देणारे सेना सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या मृत्यूनंतर पत्नी लक्ष्मीबाई यांनी आरामाराचा ताबा घेतला होता. पेशवेकाळात मस्तानीबद्दल सर्वाधिक चर्चा झालेली दिसते ती बाजीराव पेशव्यांसोबतच्या प्रेमामुळे. राधाबाई या बाळाजी विश्वनाथ यांच्या पत्नी. पतीच्या मृत्यूनंतर त्या सक्रिय झालेल्या दिसतात. गोपिकाबाई या नानासाहेब पेशव्यांच्या पत्नी. त्यांना पत्रलेखनाही विशेष हौस होती. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांनी कुटुंबातील कर्तेपण निगुतीने निभावलेले दिसते. त्यांची जाऊ आणि रघुनाथराव पेशवे यांची पत्नी आनंदीबाई यांचा नारायणराव पेशवे यांच्या खुनाच्या कटात हात असल्याची चर्चा असली त्याचा पुरावा मात्र नाही, हेही पुस्तकात नमूद केले आहे. ब्रिटिशकाळात सावंतवाडीच्या राणीसाहेब दुर्गाबाई यांचा कारभारही महत्त्वाचा आहे. ब्रिटिशांविरुद्ध लढताना प्राण गमावलेल्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाई रणांगणावरच नव्हे, तर राज्यकारभारातही किती अग्रेसर होत्या, याचे दाखले पुस्तकात मिळतात. ग्वाल्हेरच्या बायजाबाई शिंदे या दौलतराव शिंदे यांच्या पत्नी शस्त्रविद्येत पारंगत होत्या. बायजाबाईच्या सल्ल्याशिवाय कारभाराचे पानही हलत नसे, अशा नोंदी आहेत. ब्रिटिश काळात अनेक सामाजिक बदल झाले. १८३२मध्ये सतीची चाल बंद झाली. पुढे १८५६मध्ये विधवा विवाहांना मान्यता मिळाली. ग्रँड डफने म्हटले आहे की, 'महाराष्ट्रात पत्नीला गुलामासारखे वागवले जात नाही तर जोडीदारासारखे वागवले जाते.' खानदानी सत्ताधारी कुटुंबातील स्त्रिया घोडेस्वारी, शस्त्रे चालवण्यास शिकत, तर ब्राह्मण स्त्रिया लिहिणे, वाचणे, हिशेब शिकत. १८५१मध्ये फुले दाम्पत्याने मुलींसाठी शाळा सुरू करेपर्यंत इतर वर्गातील स्त्रियांचा कसल्याशी औपचारिक शिक्षणाशी संबंध नव्हता. कुणबिणींची प्रथाही याच काळातली. निराधार, दुष्काळ, युद्धात सापडलेल्या, विवाहबाह्य संबंधांचे आरोप असलेल्या बायकांना सधन लोक कुणबिणी म्हणून ठेवून घेत. त्यांच्याकडून कामे करून घेतली जात, प्रसंगी शारीरिक संबंधही ठेवले जात. त्यातून झालेली मुले गुलाम म्हणून वाढवली जात. पुस्तकाच्या सुरुवातीलाच एका महत्त्वाच्या वाक्याशी आपण अडखळतो 'यादव काळ ते पेशवे काळ अशा तब्बल ५०० वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रातील सामाजिक स्थितीत फारसा बदल झाला नाही, असे इतिहासतज्ज्ञ मानतात.' साहजिकच महिलांची स्थितीही फार बदलली नसणार, हे ओघाने आलेच. इतिहासाच्या पानांमधून विपरीत परिस्थितीतही स्वत:ला सिद्ध केलेल्या स्त्रियांबद्दलचा हा ऐतिहासिक दस्तऐवज एकत्र वाचायला मिळणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

# वाचनाच्या बदलत्या प्रेरणा; वाचनाचे महत्व...

जगज्जेता सिकंदराच्या संदर्भातील एक कथा प्रसिद्ध आहे. त्याचे सैनिक एक शहर जिंकायला गेले आणि ते जिंकून त्याच्यापाशी आले आणि आनंदाने विजयासंबंधी बोलू लागले. 'आम्ही शत्रूची सर्व केंद्रे उद्ध्वस्त केली, फक्त त्यांचे ग्रंथालय तेवढे राहिले. त्यावर सिकंदर चिडला; तो म्हणाला, 'मुर्खांनो, ग्रंथालय हे ज्ञानाचं आणि संस्कृतीच्या विकासाचं केंद्र. तेच तुम्ही सोडलंत.' संस्कृतीच्या इतिहासात पुस्तकांचं इतकं महत्त्व होतं, आणि आहे सुद्धा. आज ज्ञान आणि संस्कृतीची केंद्रे खूप विस्तारली आहेत आणि ग्रंथ या संकल्पनेचं स्वरूपही बदलत आहे, मात्र वाचन ही यातली मूळ प्रेरणा आहे. आजच्या जागतिक ग्रंथदिनी ते समजून घेणं आवश्यक आहे. प्राचीन मराठी साहित्याच्या इतिहासात ग्रंथ आणि शिक्षणाला असाधारण महत्त्व होते. समाज आलुतेदार-बलुतेदारांमध्ये विखुरलेला होता, तरीही जिजाबाईनी संभाजी महाराजांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. पेशवाईच्या काळात नकलविसांकडून पोथ्यांच्या कॉप्या करून घेतल्या जात. इंग्रजी काळात शिक्षणप्रसाराबरोबर ग्रंथमहात्म्य लोकांना पटू लागले आणि छपाईची साधने वाढली. नंतर वृत्तपत्रे आणि ग्रंथप्रकाशन वाढले. त्या काळात चार आणे माला यांसारख्या माला वाढल्या आणि तत्कालीन वाचकांची भूक त्या भागवत राहिल्या. आता पुस्तकांच्या डिजिटल आवृत्त्या बाहेर पडू लागल्या आहेत. लॅपटॉप, किंडल, ईबुक्स या नवीन माध्यमांनी प्रत्यक्ष छपाईची जागा घेतली. ग्रंथवाचनापेक्षा ग्रंथश्रवणाला महत्त्व आले. अमेरिकेत मोटारच्या प्रवासात ऑडिओ बुक ऐकण्याचे प्रमाण प्रचंड मोठे आहे. वाचनप्रक्रियेचे स्वरूप आता बदलू लागले आहे. साधारण ३० वर्षांपूर्वी आलुरकरांनी याचे महत्त्व ओळखले आणि पु. ल. देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, व. पु. काळे यांच्या पुस्तकांच्या ऑडिओ कॅसेट्स प्रकाशित केल्या. मराठी वाचकांनी प्रकाशन व्यवसायातले हे स्थित्यंतर स्वीकारले. आता पुस्तकांच्या ई आवृत्त्याही निघू लागल्या. परंतु, या सर्व आधुनिक अवताराकडे येतानाही मुळात वाचनाची आवड आणि प्रवृत्ती जपणे, ती आकाराला येणे, अभिरुची निर्माण होणे हे महत्त्वाचे आहे. संत तुकारामांच्या अभंगातील 'काही पाठ केली संतांची उत्तरे' आणि 'गाती पुढे त्यांचे धरुनि ध्रृपद' हे चरण महत्त्वाचे आहेत. ग्रंथ अवलोकणं, वाचन करणं महत्त्वाचं आहे. आपल्या संस्कृतीमध्ये 'बहुश्रुत' हा शब्द आहे, कारण एकेकाळी बरचंसं ज्ञान ऐकण्यातून येत असे. पुढे त्याचे ' ' झाले, मात्र आजच्या



काळात पुन्हा एकदा 'बहुश्रुत'ला अर्थ प्राप्त झाला आहे. चित्त एकाग्र करून, पुस्तकात डोकं खुपसून एकांतात काहीतरी कल्पित वा वैचारिक वा अनुभवाधिष्ठित वाचन करणं आणि नाटक-सिनेमा-वेबमालिका यातलं काही संवेदनशील पाहणं, ही सुद्धा आजच्या काळात ज्ञानाचं आणि संस्कृतीच्या विकासाची केंद्रं झाली आहेत. आज आपल्याला असंख्य माध्यमं उपलब्ध आहेत, पुस्तकवाचन हे त्यापैकी एक झाले आहे. या माध्यमांचा डोळस वापर होतो का, हा प्रश्न आहे. तरुणांना वाचनाची सवय राहिलेली नाही, असा नकारात्मक सूर काढला जातो. व्यापक अर्थाने तो खरा असेलही. परंतु, त्याला अपवादही अनेक आहेत. 'आजची मुलं काय वाचतात' हे पाहण्यासाठी झालेल्या सर्वेक्षणात मी सहभागी होतो. ही मुलं वाचनाची आवड असलेल्या मध्यमवर्गातील आहेत. मुलांना पुस्तकांची, लेखकांची नावं आठवत होती. पुस्तकांच्या स्वरूपाविषयी, आशयाविषयी सांगण्याविषयी ती प्रयत्न करीत होती. इंग्रजी पुस्तकांच्या अनुभवांविषयी त्यांना माहिती होती. त्यापैकी काही त्यांनी पाहिलेली होती, पण त्याविषयी ती फारशी समाधानी नव्हती, असेही दिसले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी बोलताना चेतन भगत, शोभा डे, डेल कार्निजी, रवी बापट, सुधा मूर्ती, रवीन थत्ते, वसंत वसंत लिमये, सुदीप नगरकर, मंगला गोडबोले, ह. मो. मराठे, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, उमा कुलकर्णी, अच्युत गोडबोले, पुल, वपु, शिवाजी सावंत, गोनीदां यांची नावं आली. मराठी विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नेमाडे, भाऊ पाध्ये, कुसुमाग्रज, तेंडुलकर, पाडगावकर यांचं लेखन वाचलेलं होतं. आपले तरुण नाट्य-चित्रपट कलावंत काय वाचतात याची आपल्याला कल्पना असते. एखादी स्पृहा जोशी प्रणव सखदेव यांची 'काळे करडे स्ट्रोक्स' वाचून आत्मीयतेने लिहिते, हे समाधानकाराक आहे. समकालीन मराठी लेखक प्रणव सखदेव, हृषिकेश गुप्ते, कृष्णात खोत यांचे लेखन वाचले जाते. तरुण वाचक स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक ती पुस्तकं, वेब सेरीज आणि ईबुक्सचाही वापर करतात. आपल्या ग्रंथसंग्रहालयात ग्रंथालयसेवक म्हणून काम करणारे तरुण-तरुणी अनेकदा 'एसएससी' होऊन तीन महिन्यांचा सर्टिफिकेट कोर्स करून आलेले असतात. कॉलेज आणि विद्यापीठातल्या ग्रंथालयांमध्ये काम करणारे ग्रंथालयशास्त्रात पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले असतात, पण यातील अनेकांना त्यासंबंधी फारसे ज्ञान नसते, ही गंभीर बाब आहे. अभ्यासकांना मन:पूत सहाय्य करणाऱ्या व्यक्तींची मोठी संख्या ग्रंथालयांत एकेकाळी राज्यभर होती, त्यांची संख्या आता फार कमीच असणार, याची खूणगाठ बांधून घेतली पाहिजे. महाराष्ट्रात साहित्यिक वर्तुळे विखुरलेल्या अवस्थेत का होईना, अजून आहेत, तशीच जगभरातही आहेत. मी अमेरिकेत गेलो असताना 'या शनिवारी आमचा एक गट भेटणार आहे. काही वाङ्मयीन चर्चा आम्ही करतो. तुम्ही याल का?' असे विचारल्यावर मी रुकार दिला. त्यांच्यापैकी काही सॉफ्टवेअरमधील, कुणी आर्किटेक्ट, कुणी वैज्ञानिक, कुणी अभियंता असल्याचे कळले. दोघांनी आपल्या कथांचे वाचन केले, एकाने 'महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीं'वर निबंध वाचला. एकाने 'शेतीविषयक प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या' यावर लेखन केले होते. तर एका तरुणीने 'मंगेश पाडगावकरांची कविता' यावर आपले टिपण सादर केले. वाचन झाल्यावर इतर प्रतिक्रिया देत होते. इतर मंडळींच्या प्रतिक्रिया संबंधित लेखक गंभीरपणे आपल्या वहीत नोंदवून घेत होता. एका अर्थाने तो एक त्यांच्या पातळीवरील होता. या विषयी मी विचारणा केली. तेव्हा, 'या टिपणांच्या आधारे आम्ही पुढे हे लेखन यथावकाश दुरुस्त करतो,' असे एकजण म्हणाला. 'मग ते कुठे प्रसिद्धीसाठी पाठवता का?' या प्रश्नाला त्यांनी दिलेले उत्तर मार्मिक होते. 'हा आमचा लेखनाचा रियाज समजा ना. ते प्रसिद्ध झाले तर हवेच असते. इथल्या महाराष्ट्र मंडळाच्या पत्रिकेला आम्ही क्वचित पाठवतो, पण खरं सांगू का, त्याहीपेक्षा वेळात वेळ काढून ठरवलेल्या विषयावर संदर्भ पाहणे, चिंतन करणे, मनातल्या मनात लेखनाची आखणी करणे आणि प्रत्यक्ष ते कागदावर उतरवतानाचा रोमांच अनुभवणे, आम्हांला महत्त्वाचे वाटते. शिवाय प्रत्यक्ष चर्चेत विषयाचे विविध कंगोरे स्पष्ट होतात, ते वेगळेच.' आत्मचरित्रे, चरित्रे, माहितीपर, करणूकप्रधान पुस्तकांना अधिक वाचक आहे. नाटक, कविता, कादंबऱ्या याकडे कल कमी झाला आहे. विज्ञानविषयक लेखन, समीक्षा, संशोधन याचं भान मात्र तरुणांना असल्याचे दिसत नाही. आपल्या तरुणांची ही उदासीनता मन हतबल करणारी आहे. म्हणून मी माझ्या मूळच्या निरीक्षणाकडे आपले लक्ष पुन्हा वेधतो : एकूणच माणसाला जे जे दृक्-श्राव्य, ते ते अधिकतर प्रिय होत आहे, केवळ वाचन तितकेसे भावत नसावे. यापुढे प्रसारमाध्यमं, किंडल, वेबमालिका, यांचा जमाना असणार आहे. तेव्हा त्या हाका सावधपणे ऐकून त्यांचाही वेध घ्यावा हे उत्तम!

पान १/४ वरून

## शुक्रवारी बीडमध्ये मोफत

वाटणे, शौचाच्या वेळेस मांसल गोल आकराचा भाग बाहेर येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याची तत्काळ तपासणी करुन त्यावर निदान करता येते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा आजार बळावतो. त्यासाठी तपाणी करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. या हॉस्पिटलमध्ये गुदगत आजारांसाठी क्षारसुत्र, क्षारकर्म, आग्रिकर्म सुरक्षित आयुर्वेदिक उपचार पध्दती उपलब्ध आहेत. या शिबीरामध्ये फोनवरही नाव नोंदणी करण्याची सुविध्दा उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यासाठी रुग्णांनी डॉ. सौ. शिल्पा ८६००२८७९७२, डॉ. अमोल खेत्रे ७५१७७४७९७२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून आपले नाव नोंदवावे असे अवाहन डॉ. अमोल खेत्रे यांनी केले आहे.

## अब की बार, चारसो बीस भाजप हद्दपार

निर्मिती व विकासाच्या बाबतीत कुचकामी आहेत. असा आरोप ही त्यांनी केला. अशा बिनकामाच्या भाजप उमेदवाराला मतदान करून मतदान वाया घालवू नका असे म्हणत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना मतदान करीत निवडून आणावे. असे आवाहन केले.

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्त

शेख इरफान मान्वरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम मानवलोक अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला सामाजिक, कृषी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान श्रीकन्या जाधव यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातील लोकांच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत..

## सहाय्यक आयुक्त यांची विविध

माहिती जाणून घेतली. याप्रसंगी श्री कांबळे यांनी डॉ. जगताप यांना २०२४ ची संदर्भिका दिली.

उपजिल्हाधिकारी श्री सूर्यवंशी यांच्याकडून जाणून घेतले टपाली मतदान प्रक्रिया

उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांच्याकडून टपाली मतदानांतर्गत होणारे विविध वर्गातील मतदानाची प्रक्रिया सीमा जगताप यांनी त्यांच्या कक्षात जाऊन माहिती जाणून घेतली. एकही मतदाता सुटता कामा नये यासाठी ३९ बीड लोकसभा मतदार संघ सज्ज आहे.सर्व्हिस , दिव्यांग, वृद्ध, निवडणुकीसाठी विविध सेवेत रुजू असणारे मतदार या सर्वांची काळजी भारतीय निवडणूक आयोगाने घेतली असून प्रत्येकांचे मतदान व्हावे यासाठी जिल्हा निवडणुक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात प्रयत्न सुरू असल्याचे सूर्यवंशी यांनी यावेळी सांगितले.

## पेट्रोल-गॅस महागला

आहे. मग या लोकांवर विश्वास ठेवायचा कसा, असा सवाल शरद पवार यांनी विचारला.

शरद पवारांनी मांडली देशातील बेरोजगारीची धक्कादायक आकडेवारी

शरद पवार यांनी या प्रचारसभेत देशातील बेरोजगारीच्या मुद्द्यावर भाष्य केले. पंतप्रधान मोदींनी २०१४ मध्ये सांगितलं होतं की, देशातील सर्व बेकारी घालवून सगळ्यांच्या हाताला काम देऊ. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन () ही संस्था जगभरातील रोजगाराचा अभ्यास करते. या संस्थेने भारतातील रोजगारांचा आढावा घेतला. या अहवालात देशातील १०० लोकांपैकी ८७ जण नोकरीविना असल्याची माहिती समोर आली. मग मोदींनी कसली बेकारी घालवली? त्या आश्वासनाचं काय झालं? मोदींना दिलेला शब्द पाळता आलेला नाही. मात्र, आता तेच मोदी ठिकठिकाणी जाऊन काँग्रेसला शिव्या घालत आहेत, असे शरद पवार यांनी म्हटले.

## आदर्श शिंदेंच्या

बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्रातील तसेच देशभरात सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे यांच्या भीमगीतांचा लाईव्ह-शो आयोजित केला होता. या कार्यक्रमाला प्रचंड उत्साहासह जिल्हाभरातून लोक आले होते.

# भगवान महावीर जयंतीनिमित्त अंबाजोगाईत निघाली भव्य शोभायात्रा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

२४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा २५५० वा जन्मकल्याणक महोत्सव अंबाजोगाईत साजरा करण्यात आला.या निमित्ताने अंबाजोगाई शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. अंबाजोगाईत सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव धार्मिक वातावरणात पार पडला. सकाळी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामध्ये विशेष आकर्षण म्हणजे युवती व महिलांचे ढोल पथक. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हे ढोल पथक सादरीकरण करत होते.



या मिरवणुकीत सकल जैन समाजातील सर्व श्रावक ,श्राविका सहभागी झाले होते.युवक व युवती गटाने उत्साहाने या शोभायात्रेचे नियोजन केले होते.यावेळी

भगवान महावीरांच्या जीवनावरील नाटिका जैनस्थानकमध्ये साजरी सादर करण्यात आली.जन्मकल्याणक महोत्सव अत्यंत कलात्मक पद्धतीने नृत्यातून दाखवण्यात आला.याशिवाय अभिषेक, पूजन व भजन ,महावीरजन्म या कार्यक्रमांमध्ये सर्व सकल जैन धर्मियांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला होता. भव्य अशा या शोभायात्रेचे स्वागत विविध पक्ष व संघटनांच्या प्रमुख व पदाधिकारी यांनी भगवान महावीरांना अभिवादन करून केले.या शोभायात्रेत पद्मकुमार लिंबाळकर , गौतमचंद सोळंकी डॉ. नितीन धर्मराव , शांतीलाल सेठीया, वर्धमान ढोले , धनराज सोळंकी, राजेश कंगळे , निलेश मुथा , शैलेश कंगळे , संजय सुराणा, शामराव कंगळे, साईल मुथा , सुधीर महाजन, जितेंद्र चोबारकर, आदेश कर्नावट, मनोज कंगळे , दिलीप कोंडेकर , वर्षा बडेरा, प्रार्थना चौबारकर , हर्षाली जोंधळे, डॉ प्रा अनुजा रोकडे,यांची उपस्थिती होती.

### महिलांच्या ढोल पथकाने लक्ष वेधले

भगवान महावीर यांच्या जयंती निमित्त निघालेल्या शोभायात्रेत सकल जैन समाजाच्या मुली व महिलांनी ढोल पथकाच्या माध्यमातून शिस्त व संस्कृतीचे दर्शन घडविले.हे पथक शहर वासियांसाठी आकर्षण ठरले.

### भगवान महावीर यांची शिकवण

भगवान महावीरांनी जगाला अहिंसा, सत्य , अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य ही पंचमहाव्रते आध्यात्मिक मुक्तीसाठी आवश्यक आहेत. याची शिकवण दिली. त्यांची ही शिकवण सकल जैन समाजाने अंगिकारून याचा प्रचार व प्रसार व्हावा. अशी अपेक्षा यावेळी विविध वक्त्यांनी व्यक्त केली.

# मराठा समाजासोबत मुस्लीम समाजाच्या १०% आरक्षणासाठी मनोज जरागे पाटील यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड येथील पत्रकार व तथा संपादक सलामत पठाण यांच्या निवासस्थानी मनोज जरांगे पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. तसेच मुस्लिम समाजा संदर्भात अनेक विषयावर चर्चा करुन त्यांना निवेदन देण्यात आले . निवेदनात म्हटले आहे की



मराठा योद्धा जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी आरक्षण मिळावे. या यासाठी लढा उभा केला तसेच मुस्लिम समाजासाठी सुद्धा दहा टक्के आरक्षण मिळावे व मराठा समाजासाठी लढा लढणारे मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या न्याय हक्काच्या आरक्षणासाठी आपण आंदोलनाच्या संघर्षातुन यशस्वी वाटचालीतुन क्रांती घडवीली. तसेच महाराष्ट्रात मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात गरीबीने पिछाडलेला आहे. समाजातील अर्थिक पिछाडलेल्या वर्गासाठी सर्वोत्तम सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या दृष्टीकोणातून मुस्लीम सामाजासाठी १०% आरक्षण प्रस्तावित केले गेले आहे.

या संदर्भात आपणासारख्या दणकट, निस्वार्थ क्रांतीकारी नेतृत्वाची गरज आहे. मनोज दादा पाटलांनी मुस्लीम समाजाच्या आरक्षणासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी करण्यात आली.या वेळी सामाजिक चळवळ सदस्य सलामत पठाण (पत्रकार), संपादक गंगाधर काळकुटे,शाहेद सय्यद ,नूर खान पठाण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आचार्य श्री महाश्रमणजी म. सा. यांची अहिंसा पदयात्रा पाटोद्यात

पाटोदा । प्रतिनिधी

धर्मपारायण जैन श्वोतांबर तेरापंथ धर्मसंघाचे अकरावे आचार्य महान तपस्वी युगपुरुष श्री महाश्रमणजी म.सा. यांच्या अहिंसा पदयात्रेचे आज साकत येथून पाटोदा नगरीत आगमन होणार त्यांच्या समवेत जवळपास शंभर साधू साध्वी सोबत असणार आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की युगपुरुष महाश्रमणजी म.सा. यांची ही भव्य दिव्य अहिंसा पदयात्रा समाजात सदभावना , नैतिकता ,व नशामुक्ती व धार्मिक जनजागृती यासाठी काम करत आहे. अहिंसेच्या मार्गावर सर्वांनी चालत राहावे यासाठी नेपाळ, भुटान व आपला भारत देश अशी तब्बल ३ देशात व २३ राज्यात भ्रमण करून जवळपास ६०००० किलो मिटर ची ही पायी पदयात्रा आहे आता पुढे महाराष्ट्रातून सुरत गुजरात कडे जाणार आहे .या पदयात्रेत तब्बल १०० साधू

# काँग्रेसला राज्यघटनेविषयी आदर नाही-विनोद तावडे

मुंबई : लोकसभा निवडणुकीत ( २०२४) दक्षिण गोव्याचे काँग्रेसचे उमेदवारांनी गोव्याला भारतीय संविधान लागू करू नये असे म्हटले होते. तर कर्नाटकातही अशाच प्रकारचे वक्तव्य केले होते. दुसरीकडे भाजपाला () संविधान बदलायचे आहे. म्हणून, ४०० पारचा नारा दिला जात आहे, असा दावा राहुल गांधी करतात. परंतु, काँग्रेसने आतापर्यंत ८० वेळा संविधान बदलले आहे. यावरून त्यांना राज्यघटनेविषयी आदर नसल्याचे स्पष्ट झाले आहे, असा पलटवार भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ( ) आणि भाजपावर टीका करण्यासारखे काहीच उरले नसल्याने राज्यघटना बदलासाठी भाजपला ४००पेक्षा अधिक जागा हव्या आहेत, असा अपप्रचार काँग्रेसचे नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे हे करत आहेत,' असा आरोप तावडे यांनी केला. 'मोदी सरकारच्या कार्यकाळात संविधान दिवस साजरा केला जाऊ लागला, भाजपाचे संकल्पपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी प्रसिद्ध झाले. यावरून भाजपचा डॉ. आंबेडकर आणि




राज्यघटनेबद्दलचा आदर स्पष्ट झाला आहे,' असे चोख प्रत्युत्तर तावडे यांनी दिले. राज्यातील प्रचाराच्या घसरलेल्या पातळीबाबत तावडे यांनी चिंता व्यक्त केली. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, बाळासाहेब ठाकरे, विलासराव देशमुख, शरद पवार हे नेतेही परस्परांवर टीका करीत असत. मात्र, त्या वेळी प्रचाराची पातळी घसरत नव्हती, याकडे त्यांनी लक्ष वेधले. महायुतीतील पक्षांना आपापल्या ताकदीप्रमाणे जागा मिळतील,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मोदी सरकारच्या काळात महाराष्ट्राला भरघोस यश मिळाले.

'यूपीए' सरकारच्या तुलनेत केंद्राकडून महाराष्ट्राला मिळालेल्या अनुदानात २५३ टक्क्यांनी वाढ झाली, करांच्या परताव्यापोटी मिळणाऱ्या रकमेत ३३ टक्के वाढ झाली. २०२०-२०२१ पासून ११ हजार ७११ कोटी रुपये बिनव्याजी कर्ज मिळाले, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राज्यात शहरी आणि ग्रामीण भागांत २७ लाख घरे बांधली गेली, असे त्यांनी सांगितले.मोदी सरकारच्या गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात महाराष्ट्राला भरभरून मिळाले आहे, असे सांगताना तावडे यांनी याचा लेखाजोखाच दिला. महायुतीला भरभरून मतदान होईल' महाराष्ट्रात आयुष्मान भारत योजनेचे अडीच कोटी लाभार्थी आहेत, राज्यात जनधन योजनेत ३ कोटी ४२ लाख खाती उघडली गेली. मुद्रा योजनेत महाराष्ट्रात दोन लाख ३३ हजार कोटी रुपये कर्जवाटप झाले, राज्यात आठ लाख विक्रेत्यांना स्वनिधी योजनेत कर्ज मिळाले. ७५ लाख जणांच्या घरात जलजीवन योजनेद्वारे पाणी मिळाले. अशा अनेक गोष्टींचा विचार करून मतदार भाजप आणि महायुतीला भरभरून मतदान करतील, असा विश्वास या वेळी तावडे यांनी यावेळी व्यक्त केला.

## खते बि-बियाणे दुकानदारांसाठी अत्यंत महत्त्वाच्या कृषि पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड : खते बी-बियाणे आणि औषधांचे दुकानदार म्हणजेच कृषि सेवा केंद्राचे चालकांसाठी कृषि विस्तार पदविका अर्थात देसी () डिप्लोमा इन ॲग्रीकल्चरल सव्हिसेस फॉर इनपुट डिलर्स या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून बीड जिल्हयातील सर्व खते बी-बियाणे दुकानदारांनी केंद्र शासनाच्या निर्णयानुसार तात्काळ या अभ्यासक्रमास प्रवेशासाठी संपर्क करावा, असे आवाहन सौ.के.एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा नगर रोड, बीड यांनी केले आहे. (मॅनेज) या हैद्राबाद येथील कृषि विस्तार प्रबंधन संस्थानच्या अंतर्गत वनामती, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणाऱ्या कृषि निविष्ठा वितरकांकरीता कृषि विस्तार पदविका देसी या कृषि-निविष्ठा विक्रेत्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पदविका अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण केंद्र म्हणून मा.प्रकल्प संचालक आत्मा, बीड यांच्या मार्फत सौ.के.एस. के. (काकू) कृषि महाविद्यालयास मान्यता मिळाली आहे. जे जुने कृषि निविष्ठाधारक आहेत किंवा ज्या कृषि निविष्ठाधारकांची कृषि पदवी पूर्ण नाही अशा कृषि निविष्ठाधारकांसाठी हा एक वर्षीय कृषि विस्तार पदविका अभ्यासक्रम आहे. ज्याच्या तासिका आठवडयातील फक्त एक दिवस घेतल्या जातात. ज्यामुळे त्यांच्या दैनंदिन व्यापारात अडथळा निर्माण होणार नाही. तरी या एकत्रित म्हणजेच तिन्ही निविष्ठा विक्री करिता एकच कोर्स देसी या अभ्यासक्रमाचा परिसरातील व जिल्ह्यातील सर्व कृषि सेवा केंद्र धारकांनी लाभ घ्यावा. शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा विक्रेत्यांमार्फत योग्य माहिती पुरविणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश असून या प्रशिक्षणासाठी या महाविद्यालयातील पहिल्या तुकडीच्या अभ्यासक्रमाची दखल घेवून महाविद्यालयास नोडल प्रशिक्षण संस्था म्हणून अभ्यासक्रमाच्या बॅचेसला (अनुदानित तत्वावर) मान्यता मिळाली आहे. देसी हा अभ्यासक्रम ४८ आठवडयाचा असून हा अभ्यासक्रम तिन्ही प्रकारच्या परवानाधारकांसाठी भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या या काकू कृषि महाविद्यालयातील प्रशिक्षण केंद्रा मार्फत चार तुकडया (बॅचेस) यशस्वीरित्या पुर्ण करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या चारही तुकडींचे वर्ग सुरळीत पूर्ण होवून प्रवेश घेतलेल्या कृषि निविष्ठा धारकांच्या अत्यंत समाधानकारक प्रतिक्रीया आहेत.

## भारतीय संविधान बदलण्याची भाषा करणाऱ्यांना धडा शिकविणार :पप्पू कागदे

बीड प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देश पातळीवर होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी समतेचा लढा उभा करून या देशातील शोषित, पीडित, उपेक्षितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मिती करून प्रत्येकांना स्वातंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला. हजारो वर्षाची गुलामगिरी नष्ट करून उपेक्षितांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारत देशाला बहाल केलेले भारतीय संविधान कोणी बदलण्याची भाषा करीत असेल तर त्यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त वडवणी येथे आयोजित भीम संगीत रजनी कार्यक्रमात केले. पुढे बोलताना पप्पू कागदे म्हणाले की, शोषित, पीडित, अपेक्षित समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी



आयुष्यभर संघर्ष केला. भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी हिंदू कोड बिल मंजूर करून त्यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिले. अडाणी अशिक्षित समाज बांधवांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण देऊन शिक्षणाची दारे खुली केली. एक व्यक्ती एक मत मताचा अधिकार देऊन मतदार राजा बनविले.

भारताला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग यांचा भेदभाव न करता संविधानाची निर्मिती केली. संविधानाचे रक्षण करण्यासाठी जबाबदारी या देशातील प्रत्येक भारतीयांची आहे संविधान बदलण्याची भाषा कोणी करीत असेल तर त्यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. असे प्रतिपादन पप्पू कागदे यांनी व्यक्त केले. यावेळी महादेव उजगरे, किसन तांगडे, बाबरी मुंडे, सचिन सानप, पीआय अमन शिरसाट, भाई उजगरे राजेश उजगरे एस के उजगरे, भास्कर उजगरे, प्रकाश तांगडे, श्याम उजगरे, अविनाश साळवे, सुखदेव उजगरे, सतीश उजगरे आदी उपस्थित होते.

## कमाईतही सचिन आहे सुपरहिट, जाणून घ्या किती आहे त्याची संपत्ती

मुंबई: भारतासह जेव्हा जगभरात क्रिकेटची चर्चा होते तेव्हा सचिन तेंडुलकर( ) हे नाव आपसूकच येते. सचिन आणि क्रिकेट हे एक समीकरणच आहे. त्याने भारतीय क्रिकेटमध्ये जे योगदान दिले आहे ते कोणताही क्रिकेटचाहता विसरू शकत नाही. १०० शतके आणि २०० कसोटी सामने खेळणारा सचिन जगातील एकमेव क्रिकेटर आहे. म्हणूनच त्याला कदाचित क्रिकेटचा देव म्हणत असतील.

आज २४ एप्रिलचा दिवस त्याच्यासाठी खूप खास आहे कारण सचिन ५१ वर्षांचा झाला आहे. त्याने आपल्या करिअरमध्ये इतके रेकॉर्ड बनवले आहे की क्रिकेटच्या इतिहासात त्याचे नाव सोनेरील अक्षरातच लिहिले गेले आहे. भले त्याने क्रिकेटमधून जरी निवृत्ती घेतली असली तरीही कमाईच्या बाबतीत तो आजही सुपरहिट आहे. जाणून घेऊया किती आहे त्याची नेटवर्थ आणि ब्रांड



एम्बॉर्समेंटच्या माध्यमातून तो किती कमाई करतो. क्रिकेटमध्येच रेकॉर्ड नव्हे तर जबरदस्त संपत्तीही

आपल्या क्रिकेटच्या कारकिर्दीत अनेक रेकॉर्ड आपल्या नावे करणाऱ्या सचिन तेंडुलकरचा जन्म २४ एप्रिल १९७३ला मुंबईमध्ये झाला होता. आता तो ५१ वर्षांचा झाला आहे. क्रिकेटच्या करिअरदरम्यान जिथे एकीकडे मोठमोठे रेकॉर्ड केलेत तर दुसरीकडे कमाईतही त्याचे रेकॉर्ड आहेत. जगातील श्रीमंत क्रिकेटरच्या यादीत सचिन तेंडुलकरची गणना केली जाते. रिपोर्ट्सनुसार गेल्या वर्षी २०२३ पर्यंत सचिन तेंडुलकरची नेटवर्थ १७५ मिलियन डॉलर म्हणजेच १४३६ कोटी रूपये होती. खास बाब म्गणजे भले त्याने आता क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी तो जाहिराती आणि इतर माध्यमातून तो कोट्यावधी रूपये कमावत आहे.

## कोट्यावधींमध्ये आहे बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांचा पगार

मुंबई : भारतीय क्रिकेट नियामक मंडळ जगातील सर्वात श्रीमंत मंडळ आहे. बीसीसीआयची लीग आयपीएलमधूनही तगडी कमाई करते. आयपीएलमुळेच अनेक खेळाडूंनाही भरपूर पैसे कमावण्याची संधी मिळते. साधारणपणे खेळाडूच्या पगाराबाबतची माहिती समोर येते. मात्र बोर्डाच्या अधिकाऱ्यांच्या पगाराबद्दल फार कमी लोकांना माहीत असते. बीसीसीआयमध्ये जय शाह हे नाव नेहमीच चर्चेत असते. मात्र यासोबत त्यांच्यासह मंडळामध्ये अनेक महत्त्वाची लोक काम करतात. जय शाह सचिव आहेत. तर रॉजर बिन्नी अध्यक्ष आहेत. राजीव शुक्ला बीसीसीआयचे उपाध्यक्ष आहेत. जर आयपीएल पाहिली तर याचे चेअरमन पद अरूण धुमळ यांच्याकडे आहे. रिपोर्टनुसार बीसीसीआय अध्यक्ष रॉजर बिन्नी यांना पगाराच्या रूपात दरवर्षी साधारण ५ कोटी रूपये मइळतात. रिपोर्टनुसार माजी अध्यक्ष सौरव गांगुलीलाही इतकाच पगार मिळत होता. तर सचिन आणि दुसऱ्या अधिकाऱ्यांनाही चांगली रक्कम मिळते. एका रिपोर्टनुसार बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांना मासिक पगार मिळत आहे तर दिवसाच्या हिशेबाने भत्ता मिळतो. रिपोर्टनुसार बोर्डाच्या सर्व सदस्यांना दर दिवशीच्या हिशेबाने एका बैठकीसाठी ४० हजार रूपये मिळतात. हा भत्ता आयपीएल चेअरमनवरही लागू होतो.

जय शाहच्या पगाराबाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही. मात्र रिपोर्टनुसार त्यांनाही दर दिवसाच्या हिशेबाने भत्ता मिळतो. जर ते परदेशी दौऱ्यावर गेले तर हा भत्ता वाढतो. यासोबतच येण्या-जाण्यासाठी बिझनेस क्लासचे तिकीटही मिळते.

## सौ.मनीषा पैठणकर तुलसीरत्न पुरस्काराने सन्मानित

बीड प्रतिनिधी

येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी शैक्षणीक समुह बीड यांच्या वतीने दि.२० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता तुलसी इंग्लिश स्कुल बीड येथे तुलसीरत्न पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तुलसी इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका सौ.मनीषा पैठणकर तुलसीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे, तुलसी शैक्षणिक समूहाच्या प्रेरणास्थान तुळसाबाई रोडे, कॅनरा बँक बीड शाखा व्यवस्थापक सतिष कुमार, निवृत्त, डिवायएसपी.सी.आर. रोडे, निवृत्त शिक्षणाधिकारी माऊली सोनवणे, श्रावस्ती शि.प्र. व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अध्यक्ष जालना बाळासाहेब दांडगे, आर.डी.जोगदंड, प्रा.राम गायकवाड, तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय



प्राचार्य डॉ. एल.एम.थोरात, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले, तुलसी इंग्लिश स्कुल बीड प्राचार्य उमा जगतकर, नालंदा कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन प्राचार्य डॉ.शैलेजा पैकेकर, मॉर्डन संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर प्राचार्य ज्योती मोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ.अस्मिता साळवे यांची उपस्थिती होती. तुलसी शैक्षणिक समूहाच्या प्रेरणास्थान तुळसाबाई रोडे हस्ते सौ.मनीषा पैठणकर सन्मानित करण्यात आले.या पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, २५ हजार रुपयांचा धनादेश असे होते. तसेच संस्थेमधील कर्मचारी संतोष प्रधान, ज्योती मोरे यांना ५० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावेळी तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ३९ बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक पाचव्या दिवशी ५ अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल आजपर्यंत एकूण १५ उमेदवारी अर्ज दाखल

बीड : ३९ बीड लोकसभा मतदारसंघामध्ये आज पाचव्या दिवशी पाच नामनिर्देशन पत्र दाखल झाली असून हे सर्व अपक्ष उमेदवार आहेत.

३९ बीड लोकसभा मतदारसंघातून आज ५ अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यामध्ये शेख याशेद शेख तय्यब, वचिष्ट उद्धव कुटे, राजेंद्र अच्युतराव होके आणि शितल शिवाजी धोंडरे यांनी दोन अर्ज सादर केले. असे एकूण पाच नामनिर्देशन अर्ज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या समक्ष सादर केले आहेत. आज पर्यंत एकूण १०८ इच्छुक उमेदवारांना २४६ नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी दि. १८ एप्रिल २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून २५ एप्रिल २०२४ ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर २६ एप्रिल२०२४ रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. २९ एप्रिल २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे.

सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत राहील आतापर्यंत सादर केलेले नामनिर्देशन अर्ज अपक्ष उमेदवार- शेख तौसिफ अब्दुल सत्तार, सादिक इब्राहिम शेख, उदयभान नवनाथ राठोड, शेख एजाज शेख उमर, भास्कर किसन शिंदे, तुकाराम विठोबा उगले, शेख याशेद शेख तय्यब, वचिष्ट उद्धव कुटे, राजेंद्र अच्युतराव ठोके व शितल शिवाजी धोंडरे (दोन अर्ज) . भारतीय जवान किसान पार्टी (इंडिया) पक्षाकडून अंकुश रामा खोटे यांनी अर्ज दाखल केला. नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाकडून बजरंग मनोहर सोनवणे यांनी दोन अर्ज तर सारिका बजरंग सोनवणे यांनी एक अर्ज दाखल केला.

## आरबीआयची कडक कारवाई! 'या' बँकेतील ग्राहकांना खात्यातून पैसे काढण्यावर निर्बंध

मुंबई : रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी बँकांविरोधात कडक पाऊले उचलण्यात आली आहेत. आरबीआयने आयडीएफसी फस्ट बँक , एलआयसी हाऊसिंग फायनान्स ( ) तसेच शिरपूर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक ऑफ महाराष्ट्र यावर आरबीआयने कारवाई केली होती. त्यानंतर आरबीआयने आता आणखी एका बँकेवर बंदी घातली आहे. महाराष्ट्रातील उल्हासनगर येथील कोणार्क अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेवर रिझर्व्ह बँकेने पैसे काढण्यासह अनेक निर्बंध लादले आहेत. या बँकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे.

आरबीआयने केलेल्या कारवाईनुसार, कोणार्क अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेवर बैंकिंग नियमन कायदा १९४९ च्या कलम ३५ अन्वये निर्बंध २३ एप्रिल २०२४ (मंगळवार) रोजी कामकाज बंद झाल्यापासून लागू झाले आहेत. या निर्बंधांमुळे रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय बँक कोणतेही कर्ज नूतनीकरण करू शकत नाही.




आणि आगाऊ रक्कम मंजूर किंवा कोणीही गुंतवणूक करू शकत नाही. कोणतेही दायित्व हस्तांतरित करू शकत नाही किंवा त्याच्या कोणत्याही मालमत्तेची विल्हेवाट लावू शकत नाही.

बँकेची सध्याची स्थिती लक्षात घेता ठेवीदाराच्या सर्व बचत खात्यांमध्ये किंवा चालू खात्यामध्ये किंवा इतर कोणत्याही खात्यातील एकूण शिल्लक रकमेतून कोणतीही रक्कम काढण्यास परवानगी दिली जाऊ शकत नाही, परंतु कर्जाचे समायोजन करण्यास परवानगी देण्यात आली आहे. ग्राहकांना मिळणार ५ लाख रुपये बँकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने बँकेवर हे निर्बंध लादण्यात आले आहेत. पात्र ठेवीदारांना ठेव विमा व पत हमी महामंडळाकडून (डीआयसीजीसी) त्यांच्या ठेवींमधून पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेव विमा दाव्याची रक्कम मिळणार आहे. बँकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईपर्यंत निर्बंधांसह बँकिंग व्यवहार सुरूच राहतील, असे आरबीआयने म्हटले आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
बुधवार दि.२४ एप्रिल २०२४ (पान ४)




# नारायणगडला इश्वरांपासूनची धार्मिक परंपरा - जोशी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

धार्मिक व वारकरी संप्रदायात वेगवेगळे पंथ आहेत, या पंथातील आद्य नारायणा पासुनची परंपरा ही श्री क्षेत्र नारायण गडला असल्याचे प्रतिपादन अमृताश्रम महाराज जोशी यांनी केले. ते, सिरसमार्ग येथील नारळी सप्ताहात हरी कीर्तनात बोलत होते. यावेळी महंत शिवाजी महाराज यांच्यासह संतमहंत उपस्थित होते.

सिरसमार्ग येथे सुरु असलेल्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहात सोमवारी दुसरे कीर्तन पुष्प गुंफताना बोलत होते. यावेळी कीर्तनाचे निरुपण करताना अमृताश्रम महाराज यांनी नारायण गडची धार्मिक परंपरा विषद केली. अमृताश्रम महाराज म्हणाले आद्य नारायण, ब्रम्हदेवापासून ही परंपरा पैठण येथील संत एकनाथ महाराज पीठ ते नारायण गड पर्यंत असल्याचे ते म्हणाले. यावेळी कीर्तनात बोलताना धार्मिक क्षेत्रातील सर्व पंथ व त्यांची परंपरही जोशी महाराज यांनी व्यक्त केली.

श्री क्षेत्र नारायण गड येथे स्वयंभू ज्योतिर्लिंग प्रकट होत असून प्रभू रामचंद्र पासूनचे कृपाशिर्वाद असल्याचा श्री क्षेत्र नारायण गडचा महिमाही त्यांनी विषद केला.



**सप्ताहात महिलांची लक्षणीय उपस्थिती**

सिरसमार्ग येथे सुरु असलेल्या नारळी सप्ताहात महिलांची लक्षणीय उपस्थिती आहे. सिरसमार्गसह तरटेवाडी. काळेवाडी, शहाजानपूर, दिमाखवाडी, टाकळगव्हाण, मानकापूर, खडकी, मादळमोही, पोखरी, लोळदगाव, साक्षाळपिंप्रीसह परिसरातील अनेक गावच्या महिला उपस्थिती लावत आहेत.

**थोरामोठ्यांनी घेतले बाबांचे आशीर्वाद**

सिरसमार्ग येथील नारळी सप्ताहात थोरामोठ्यांची व संतमहंतांची उपस्थिती राहिली आहे. यामध्ये नामदेव महाराज शेकटेकर, जिल्हा परिषद सदस्य बप्पासाहेब अण्णा तळेकर, गडाचे विश्वस्त सीए बी.बी.जाधव, बळीराम अप्पा गवते आदींनी उपस्थिती लावली आहे. सप्ताहात युपीएससी उत्तीर्ण झालेले पाडळी येथील अभिजित पाखरे यांनी महंत शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांनी त्यांचा सत्कार केला.

**सिरसमार्गकरांच्या नियोजनाला दाद**

सिरसमार्ग येथे सुरु असलेल्या नारळी सप्ताहात ग्रामस्थांनी वेगवेगळ्या दहा समिती तयार करुन नियोजन केले आहे. यामध्ये पिण्याचे पाणी व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, महाप्रसाद भोजन व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था अगदी काटेकोरपणे कार्यरत आहे. तरुणांच्या या नियोजनला महंत शिवाजी महाराज यांच्यासह येणारे भाविक दाद देत आहेत.

# दिव्यांगांना सुगम्य सुविधासह अन्य बाबींसाठी सहाय्यक आयुक्त डॉक्टर जगताप यांच्या मतदान केंद्रांना भेटी

**बीड । प्रतिनिधी**

३९ बीड लोकसभा मतदारसंघात दिव्यांग मतदारांना सुगम्य सुविधा, तसेच मतदान केंद्रावर अन्य सुविधा असाव्यात यासाठी छत्रपती संभाजी नगर येथील आयुक्त कार्यालयाच्यावतीने सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन) डॉक्टर सीमा जगताप यांनी मंगळवारी दौरा केला.



सहाय्यक आयुक्त डॉक्टर जगताप यांनी माजलगाव, बीड, व गेवराई या तीन विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांचा पाहणी दौरा करून आढावा घेतला. या ठिकाणी दिव्यांगांना सुगम्य सुविधा आहेत का याची पाहणी केली यासह मतदान केंद्रावर आवश्यक सुविधांची पाहणी केली. माजलगाव येथील दौऱ्या दरम्यान तहसीलदार वर्षा मनाळे या त्यांच्यासोबत होत्या.

बीड तसेच गेवराई मतदान केंद्रात भेटी देऊन त्यांनी या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधांची पाहणी केली. यावेळी नायब तहसीलदार सुहास हजारे त्यांच्यासोबत होते. माजलगाव, बीड, गेवराई येथील मतदान केंद्राची पाहणी केल्यानंतर डॉक्टर सीमा जगताप यांनी समाधान व्यक्त केले.




# जिल्हा निवडणूक अधिकारी यांची नेकनूर एसएसटी पथकाला भेट

**बीड :** ३९ बीड लोकसभा मतदार संघातील २३२ केज विधानसभा मतदार संघामधील सफेपुर फाटा, नेकनुर ता. बीड येथील सांख्यिकी पाळत पथक ( ()) ला आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

# जिओ जिंदगी अभियानाची आरोग्य सेवा समाजाच्या हिताची - महंत श्री शिवाजी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे श्री क्षेत्र नारायणगड संस्थान अखंड हरिनाम नारळी सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या ठिकाणी दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ शेकडो वारकरी बांधवांनी घेतला.

हभप महंत श्री शिवाजी महाराज यांच्या उपस्थितीत या आरोग्य शिबिराची सुरूवात करण्यात आली. यावेळी डॉ पंकज घोडके यांनी आरोग्य सेवा जिओ जिंदगी अभियानाच्या वतीने दिली. यावेळी धनंजय गुंदेकर व रोहित लंबे यांनी या अभियानाचे नियोजन केले. महंत श्री शिवाजी महाराज यांनी यावेळी जिओ जिंदगी अभियानाच्या आरोग्य सेवेचे कौतुक करत ही सेवा समाजाच्या हिताची असल्याचं यावेळी म्हंटले. या अभियानात रक्तदाब तपासणी, सुगर तपासणी करण्यात आली. २२ रक्तदाब,



५३ सुगर, जनरल ४६७ वारकरी, भाविक भक्तांना यावेळी मोफत औषधे, गोळ्या देण्यात आल्या. या अभियानासाठी अंस सर्जिकल, बीड यांनी औषधे दिली.

# शुक्रवारी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी महिलांसाठी तज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

मुळव्याधाच्या रुग्णांसाठी मुळव्याध तज्ज्ञ डॉ. अमोल खेत्रे यांनी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरात पुणे, छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांची टिम पूर्णपणे मोफत तपासणी करणार आहे. विशेष म्हणजे महिलांच्या तपासणीसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे. हे शिबीर बीड शहरातील जालना रोड येथील सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे



शुक्रवार दि. २६ एप्रिल २०२४ रोजी होणार आहे. शिबीरातील रूग्णांना औषध उपचारातही सुट देण्यात येणार आहे.

मुळव्याध-भगंदर-फिशरचे

## बीडच्या सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटलचा उपक्रम

लक्षणे आढळून आल्यास तत्काळ डॉक्टरांकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. तपासणी न केल्यामुळे मुळव्याध हा आजार वाढतच जातो. आणि त्याचे दुष्परिनाम भविष्यात रूग्णांना सहन करावे लागतात. सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल बीडच्या वतीने मुळव्याध- भगंदर-फिशरची मोफत तपासणी शुक्रवार दि. २६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. बीड शहरातील जालना रोड येथील डी.सी. लोढा कॉम्लेक्स, मंत्री बँकेच्या शेजारी असलेल्या सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे हे शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. मुळव्याध-भगंदर-फिशर याचे लक्षणे मलप्रवृत्तीच्या वेळेस किंवा नंतर रक्त पडणे, शौच्याच्या जागेवर आजुबाजुला गाठ येणे, त्यामधून चिकट स्त्रव व रक्त येणे, शौचाच्या जागी आग होणे, वेदणा होणे, टोचल्यासारखे ▶▶ पान २ वर...

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सौ.श्रीकंन्या राजेंद्र जाधव यांना आदर्श शेतकरी महिला पुरस्कार प्रदान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

चांगल्या कामाची दखल आपोआप घेतलीच जाते....आपन आपले काम निस्वार्थी भावनेने करत राहिले पाहिजे असे म्हटले जाते आणि त्या कामाची दखल एक ना एक दिवस घेतली जाते याची प्रचिती सौ श्रीकंन्या राजेंद्र जाधव यांना आदर्श शेतकरी महिला पुरस्कार मिळाल्याने आली आहे.

मानवलोक अंबाजोगाई येथे जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सौ. श्रीकंन्या राजेंद्र जाधव यांना आदर्श शेतकरी महिला पुरस्काराने




सन्मानित करण्यात आले असून


जागतिक वसुंधरा दिनानिमित्त मानवलोक अंबाजोगाई येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ए. डी. एम अँग्रो लातुर, मानवलोक अंबाजोगाई,वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ परभणी,कृषि महाविद्यालय लातूर, कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श शेतकरी महिला पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सौ. श्रीकंन्या राजेंद्र जाधव, मु. श्रीपतरायवाडी तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड यांना आदर्श शेतकरी महिला पुरस्कार वसंतराव कृषि विद्यापीठ परभणी मा.कुलगुरू डॉ. अशोक ढवण , मानवलोक कार्यवाह अनिकेत लोहिया, कृषि विद्यावेत्ता डॉ. अरूण गुट्टे ,आत्मा प्रकल्प संचालक सुभाष साळवे , ए. डि. एम संचालक गागरे , कृषि सहाय्यक काकडे, गुळभिले ,मानवलोकचे ▶▶ पान २ वर...

# जयसिंगनगर ता. पाटोदा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे नियोजन

**पाटोदा । प्रतिनिधी**

जयसिंग नगर ता. पाटोदा येथे सालाबादप्रमाणे वर्ष नववे ज्ञानेश्वरी पारायण आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे ह भ प सतीश महाराज उरणकर विठ्ठल रुक्माई संस्थान पाटोदा यांच्या हस्ते याही वर्षी आयोजन करण्यात आले आहे हा सप्ताह दिनांक २३.४.२०२४ पासून ते दिनांक ३०.४.२०२४ होणार आहे. यामध्ये ह भ प राजेंद्र महाराज दराडे ह भ प उत्तरेश्वर महाराज पावशे ह भ प भरत महाराज चौरे ह भ प मारुती महाराज कोंढाळ ह भ प विकास महाराज बिडगर ह भ प सुदर्शन महाराज खरात आणि ह भ प बब्रुवान महाराज सुरवसे यांचे कीर्तने होणार आहेत काल्याचे किर्तन वैराग्यमूर्ती ह भ प सतीश महाराज उरणकर यांचे होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सप्ताहातील हरिकीर्तनाचा अवश्य लाभ घ्यावा असे कळविण्यात येत आहे.



# रामराव राऊत यांचे निधन

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील बर्हाणपुर येथील रामराव राऊत यांचे आज सकाळी ८ वाजता औरंगाबाद येथील एका खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले.

गेवराई तालुक्यातील बर्हाणपुर येथील प्रगतीशील शेतकरी रामराव राऊत यांचे आज सकाळी वयाच्या ७८ व्यावर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता परिसरात कळताच हळहळ व्यक्त केली जात असून रामराव राऊत हे मनमिळावू व सर्वांना आपुलकीची वागणुक देत असून गोरगरीबांच्या सुख दुःखात नेहमी धावून जाणारे अशी त्यांची



ओळख होती. ते माळी महासंघाचे सदस्य लक्ष्मण राऊत यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

# अब की बार, चारसो बीस भाजप हद्दपार करा - पुजाताई मोरे

**बीड / गेवराई । प्रतिनिधी**

अब की बार हे बनवाबनवी करण्यात तरबेज असलेले व फसव्या घोषणा करणारे चारसो बीस भाजप हद्दपार करा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पुजाताई मोरे यांनी तलवडा (ता. गेवराई) येथे कॉर्नर सभेत केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ तलवाडा (ता. गेवराई) येथे आयोजित कॉर्नर



सभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पुजाताई मोरे या बोलत होत्या. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, युवा नेते युद्धजित पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना पुजाताई मोरे यांनी भाजपच्या अबकी बार....या घोषणेचा खरपूस समाचार घेत केंद्रात आणि राज्यात भाजपा सरकार असताना जिल्ह्यात पंकजा मुंडे, प्रितम मुंडे, धनंजय मुंडे हे रोजगार ▶▶ पान २ वर...

# योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड चंद्रशेखर बर्दापुरकर अध्यक्ष तर कमलाकर चौसाळकर नवे सचिव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी अग्रेसर असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी, ख्यातनाम अभियंता श्री. चंद्रशेखर बर्दापुरकर यांची तर सचिवपदी कमलाकर चौसाळकर यांची बहुमताने निवड करण्यात आली असून उर्वरीत कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी जी.बी. व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्षपदी डॉ. शैलेश वैद्य आदींची बिनविरोध निवड करण्यात आली असून संचालक म्हणून एन. के.गोळेगांवकर,एम.एस. लोमटे,भीमाशंकर शेटे, लंकेश वैद्य, आर.व्ही. सोनवळकर,अंगद कराड,प्रताप पवार, अभिजित लोहिया, सय्यद पाशुमियाँ,प्रा. जयश्री देशपांडे,ॲड. कल्याणी विर्धे आदींची निवड करण्यात आली आहे. यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

**योगेश्वरी शिक्षण संस्थेची वाटचाल नेत्रदिपक -न्या. आर.एम.बोर्डे**

योगेश्वरी शिक्षण संस्थेने स्वातंत्र्यपूर्व काळापासुन जतन असलेली परंपरा कायम ठेवून शैक्षणिक कार्यात नेत्रदिपक वाटचाल केली म्हणूनच महाराष्ट्र व त्याबाहेर शिक्षणक्षेत्रात नैतिक दबदबा टिकवुन असल्याचे प्रतिपादन योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष तथा खंडपीठाचे निवृत्त न्यायमुर्ती आर.एम.बोर्डे यांनी केले.





ते संस्थेच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना बोलत होते ते म्हणाले की,योगेश्वरी शिक्षण संस्थेने त्या काळी गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची दिशा निश्चित करून आपले उद्घोषित ध्येय साकारले माजी विद्यार्थी,दानशुर दाते यांच्या आधारावर संस्थेने निष्ठापूर्वक शैक्षणिक कार्य केले म्हणुनच संस्थेचे मनोबल वाढलेले दिसते विभुतींनी सांगितलेला विचार रुजविण्याचे कार्यही अव्याहतपणे चालू असून संस्थेने शताब्दी महोत्सवही साजरा केला. यावेळी अहवालाचे वाचन करण्यात आले. सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली.डॉ.खुरसाळे यांनी संस्थेच्या एकूण प्रगतीबाबत माहिती सांगून सहकार्य केल्या बद्दल आभार मानले.कार्यक्रमाचे संचालन व आभार जी.बी.व्यास यांनी मानले यावेळी संस्थेचे सभासद,हितचिंतक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २८ एप्रिल रोजी मोफत त्वचारोग तपासणी शिबिर -डॉ. जेथलिया

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील जुना कोर्ट रोड, श्री सिद्धेश्वर महाविद्यालय च्या बाजूला असलेल्या जेथलिया हॉस्पिटल येथे २८ एप्रिल २०२४ रविवार रोजी बीड येथील प्रसिद्ध त्वचा रोग तज्ञ डॉ संजय बजाज यांचे मोफत त्वचा रोग तपासणी शिबीर यांचे सकाळी ११ ते ३या वेळेत आयोजित केले आहे तरी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ ऋषिकेश जेथलिया यांनी केले आहे.

शहरात नव्यानेच झालेल्या जेथलिया हॉस्पिटल ला २८एप्रिल रोजी एक महिना होत असून या निमित्त बीड येथील प्रसिद्ध त्वचा रोग तज्ञ डॉ संजय सतिश बजाज यांच्या मोफत त्वचा रोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात तरुणच्या चेहऱ्यावरील पीपल्स, वांग, काळे डाग, सोरायसिस, गजकर्ण तसेच केसाचे विकार, नखाचे विकार, गुप्तरोग, कुष्टरोग, सोंदर्यवर्धक उपचार यांची तपासणी करण्यात येणार आहे. सोबतच रक्त तपासणीवर ही ५०%पर्यंत ची सूट या दिवशी दिली जाणार आहे. तरी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ ऋषिकेश संतोषकमार जेथलिया यांनी केले आहे.